# -: नागरीकांची सनद :-

1. **प्रस्ताविक :-** 97 व्या घटनादुरूस्तीनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मध्ये सुधारणा होऊन कलम 73 सीबी या नविन कलमाचा समावेश करण्यात आलेला आहे. सुधारीत तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक सहकारी संस्थेच्या निवडणूका (250 पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था वगळून ) घेण्याकरीता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण या स्वायत्त, स्वतंत्र व वैधानिक अस्तीत्व असलेल्या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. सहकारी संस्थांमध्ये लोकशाही तत्व अबाधित राखण्याची प्रमुख जबाबदारी प्राधिकरणाची आहे. प्राधिकरणाचा मुख्य उद्‌देश सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया भयमुक्त, पारदर्शक व मोकळया वातावरणात पुर्ण करणे हा आहे. प्राधिकरणामार्फत राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी साखर कारखाना, नागरी सहकारी बँक, पतसंस्था, गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, प्रक्रिया संस्था, औदयोगीक संस्था, सर्वसाधारण संस्थांच्या निवडणूक प्रकिया पार पाडल्या जातात. सहकारी संस्थांच्या निवडणूक घेण्याकरीता प्राधिकरणाने राज्यातील निबंधकांना जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र व मुख्यालय अनुसार जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडून संबंधीत सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. निवडणूकी दरम्यान जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडून मतदार यादी अंतीम करण्याचे काम प्रामुख्याने केले जात असून निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबवीली जाते.

2. **कार्यसुची :-**

| **प्राधिकरणस्तर** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **सेवा/कार्यसुची** | **कालमर्यादा** | **जबाबदार अधिकारी/ कर्मचारी** | **विहित कालावधीत सेवा न पुरवल्यास ज्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| 1. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतरीम उत्तर देणे | 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 2. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतीम उत्तर देणे | 45 दिवस | सचिव | आयुक्त |
| 3. | मतदारयादी करीता अर्हता दिनांक निर्धारीत करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 4. | निवडणूक निर्णय अधिकारी | प्रस्ताव प्राप्तीनंतर | सचिव | आयुक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नियुक्ती करणे. | 7 दिवस | | |
| 5. | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती करणे | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 6. | प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 7. | निवडणूक निरिक्षक नियुक्ती करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 8. | क्षेत्रिय अधिकारी नियुक्ती करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |
| 9. | निवडणूक कार्यक्रमास मंजूरी देणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवस | सचिव | आयुक्त |

| **जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारीस्तर (अ व ब वर्ग संस्था)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यसुची/सेवा** | **कालमर्यादा** | **जबाबदार अधिकारी/ कर्मचारी** | **विहित कालावधीत सेवा न पुरवल्यास ज्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| 1. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतरीम उत्तर देणे | 7 दिवस | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 2. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतीम उत्तर देणे | 45 दिवस | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 3. | सभासद संस्थांकडून प्रतिनिधी नियुक्तीचे ठराव मागवणे. | संचालक मंडळ मुदत संपण्याच्या 150 दिवस अगोदर | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 4. | प्रारूप मतदारयादी प्रसिध्द करणे. | यादी प्राप्तीनंतर 10 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 5. | प्रारुप मतदारयादीवर आक्षेप/हरकती मागवणे. | यादी प्रसिध्दीपासून 10 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 6. | प्राप्त आक्षेप/हरकतींवर निर्णय घेणे. | आक्षेप घेण्याच्या शेवटच्या दिनांकापासून 10 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 7. | अंतीम मतदारयादी प्रसिध्द करणे. | आक्षेप घेण्याच्या शेवटच्या दिनांकापासून 15 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 8. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचा प्रस्ताव प्राधिकरणास | मतदारयादी अंतीम होण्याच्या 21 | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सादर करणे. | दिवस अगोदर | | |
| 9. | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचा प्रस्ताव सादर करणे. | मतदारयादी अंतीम झाल्यानंतर लगेचच | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 10. | निवडणूक निकाल जाहिर करणे. | निकाल प्राप्तीपासून 15 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 11. | अध्यासी अधिकारी नियुक्ती करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवसांत | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |

| **तालुका सहकारी निवडणूक अधिकारीस्तर (क व ड वर्ग संस्था)** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यसुची/सेवा** | **कालमर्यादा** | **जबाबदार अधिकारी/ कर्मचारी** | **विहित कालावधीत सेवा न पुरवल्यास ज्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| 1. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतरीम उत्तर देणे | 7 दिवस | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 2. | जनतेकडून आलेल्या तक्रारीच्या निवारणा संबंधी अंतीम उत्तर देणे | 45 दिवस | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 3. | सभासद संस्थांकडून प्रतिनिधी नियुक्तीचे ठराव मागवणे. | संचालक मंडळ मुदत संपण्याच्या 150 दिवस अगोदर | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 4. | प्रारूप मतदारयादी प्रसिध्द करणे. | यादी प्राप्तीनंतर 10 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 5. | प्रारुप मतदारयादीवर आक्षेप/हरकती मागवणे. | यादी प्रसिध्दीपासून 7 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 6. | प्राप्त आक्षेप/हरकतींवर निर्णय घेणे. | आक्षेप घेण्याच्या शेवटच्या दिनांकापासून 7 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 7. | अंतीम मतदारयादी प्रसिध्द करणे. | आक्षेपावरील निर्णया नंतरचा पुढील दिवस | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 8. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचा प्रस्ताव प्राधिकरणास | मतदारयादी अंतीम होण्याच्या 7 दिवस | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक | सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सादर करणे. | अगोदर | अधिकारी | |
| 9. | प्राधिकृत अधिकारी नियुक्ती प्रस्ताव सादर करणे. | मतदारयादी अंतीम होण्याच्या 7 दिवस अगोदर | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 10. | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचा प्रस्ताव सादर करणे. | मतदारयादी अंतीम झाल्यानंतर लगेचच | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 11. | क वर्ग संस्था निवडणूक कार्यक्रमास मान्यता देणे | अंतीम मतदारयादी प्रसिध्द झाल्यानंतर 11 ते 19 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 12. | निवडणूक निकाल जाहिर करणे. | निकाल प्राप्तीपासून 3 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |
| 13. | अध्यासी अधिकारी नियुक्ती करणे. | प्रस्ताव प्राप्तीनंतर 7 दिवसांत | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी | सचिव |

| **निवडणूक निर्णय अधिकारीस्तर** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यसुची/सेवा** | **कालमर्यादा** | **जबाबदार अधिकारी/ कर्मचारी** | **विहित कालावधीत सेवा न पुरवल्यास ज्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी** |
| 1. | निवडणूक कार्यक्रम मान्यतेस्तव सादर करणे | अंतीम मतदार यादी प्रसिध्दीनंतर 10 दिवसांत | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |
| 2. | ड वर्ग संस्था निवडणूकीकरीता अधिमंडळाच्या विशेष सभेची नोटीस काढणे. | आदेश प्राप्तीनंतर 2 दिवसांत किंवा प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या दिनांकाच्या किमान 17 दिवस अगोदर यापैकी जे अगोदर असेल ते. | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |
| 3. | अ व ब वर्ग संस्था निकाल सादर करणे. | निकाल जाहिर केल्याच्या दिनांकापासून 7 दिवसांत | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |
| 4. | क व ड वर्ग संस्था निकाल सादर करणे. | निकाल जाहिर केल्याच्या दिनांकापासून 2 दिवसांत | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |
| 5. | पदाधिकारी निवड करणे. | जिल्हा/तालुका/प्रभाग स.नि.अ. यांनी निवडणूक | निवडणूक निर्णय | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निकाल अधिसुचीत केल्याच्या दिनांकापासून 7 दिवसांत | अधिकारी | अधिकारी |
| 6. | निवडणूकी संबंधीत कागदपत्रे जतन करणे. | निवडणूक निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यांपर्यंत | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |
| 7. | निवडणूकी संबंधीत कागदपत्रे नष्ट करणे. | निवडणूक निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून 6 महिन्यानंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण/न्यायालयाचे आदेश नसल्यास. | निवडणूक निर्णय अधिकारी | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी |

**3. संस्था प्रकार :-** निवडणूकीकरीता सहकारी संस्थांचे वर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. त्यानुसार राज्य शासनाने सहकारी संस्थांचे अ, ब, क व ड वर्गात खालील प्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. वर्गीकरणाबाबत कोणताही विवाद उदभवल्यास सदर प्रकरणी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिलेला निर्णय अंतीम असून तो विवादाच्या सर्व पक्षकारांवर बंधनकारक आहे. वर्गीकरणातील अ व ब वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया नियम 18 मधील तरतुदीप्रमाणे, क वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया नियम 75 प्रमाणे व ड वर्गातील सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया नियम 76 मधील तरतुदीप्रमाणे पुर्ण होते.

| **अ.क्र** | **संस्था वर्ग** | **अ.क्र.** | **संस्था प्रकार** |
|---|---|---|---|
| 1 | अ वर्ग | 1 | राज्य स्तरीय शिखर किंवा संघीय सहकारी संस्था |
| | | 2 | महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक |
| | | 3 | महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुउददेशीय विकास बॅक |
| | | 4 | महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ |
| | | 5 | महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ |
| | | 6 | महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महामंडळ |
| | | 7 | सर्व सहकारी साखर कारखाने |
| | | 8 | सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका |
| | | 9 | सर्व सहकारी सूत गिरण्या |
| | | 10 | मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी एक लाख लिटर किंवा एक लाख लिटरपेक्षा जास्त दूध संकलन असणारे सर्व सहकारी दूध महासंघ किंवा संघ |
| 2 | ब वर्ग | 1 | सर्व नागरी सहकारी बॅका |
| | | 2 | सर्व पगारदारांच्या सहकारी बॅका |
| | | 3 | सर्व प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था आणि आदिवासी कृषि |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सहकारी पतसंस्था |
| | | 4 | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापेक्षा जास्त आहे. |
| | | 5 | लगतपूर्वीच्या वर्षाच्या दिनांक 31 मार्च रोजी, रूपये 1 कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भाग भांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था, |
| | | 6 | साखर कारखाने वगळता शासकीय सहाय्य मिळालेल्या इतर सर्व सहकारी प्रक्रिया संस्था |
| | | 7 | शासकीय सहाय्य मिळालेल्या सहकारी औदयोगिक संस्था व सहकारी औदयोगिक वसाहती |
| | | 8 | सर्व जिल्हा किंवा तालुक सहकारी खरेदी - विक्री संघ |
| | | 9 | सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था |
| | | 10 | सर्व सहकारी रुग्णालये आणि सहकारी शैक्षणिक संस्था |
| | | 11 | मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी 1,00,000 लिटर पेक्षा कमी दूध संकलन असणारे सर्व सहकारी दूध महासंघ |
| | | 12 | अ वर्ग प्रकारात न मोडणारे इतर कोणतेही जिल्हा किंवा तालुका सहकारी महासंघ किंवा संघ |
| 3 | क वर्ग | 1 | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापुरते आहे. |
| | | 2 | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक 31 मार्च रोजी रूपये 100 लाखापेक्षा कमी वसूल भाग भांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था |
| | | 3 | लगतच्या मागील वर्षी दिनांक 31 मार्च रोजी 200 किंवा 200 पेक्षा जास्त असलेल्या गृहनिर्माण संस्था |
| | | 4 | सर्व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था |
| | | 5 | सर्व प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था ज्यांचे दैनिक सरासरी दुग्ध संकलन लगतच्या आर्थिक वर्षात 100 लिटर किंवा 100 लिटरपेक्षा जास्त आहे. |
| | | 6 | सर्व विभागीय आणि जिल्हा सहकारी मंडळे |
| | | 7 | सर्व प्रकारच्या प्राथमिक सहकारी पणन संस्था. |
| | | 8 | इतर कृषि सहकारी संस्था |
| | | 9 | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक 31 मार्च रोजी 200 किंवा 200 पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था. |
| 4 | ड वर्ग | 1 | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक 31 मार्च रोजी 200 पेक्षा कमी सभासद असलेल्या सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था |
| | | 2 | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक 31 मार्च रोजी 200 पेक्षा कमी सभासद असलेल्या सर्व सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पाणी वापर संस्था |
| | | 3 | सर्व मजूर वन कामगार सहकारी संस्था |
| | | 4 | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी औदयोगीक संस्था |
| | | 5 | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी प्रक्रिया संस्था साखर कारखाने वगळून |
| | | 6 | सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था |
| | | 7 | सर्व प्राथमिक दुग्ध संस्था ज्यांचे मागील आर्थिक वर्षात दैनिक सरासरी दुध संकलन 100 लिटरपेक्षा कमी आहे. |
| | | 8 | सर्व प्राथमिक कुक्कट, मत्स्य, सुकरालय आणि पशुधन सहकारी संस्था |
| | | 9 | स्वयं व्यवसाय सहकारी संस्था, बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था आणि ज्या संस्थांची नोंद सर्वसामान्य संस्था हया वर्गीकरणात झालेली आहे. |

4. **जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी :-** प्राधिकरणाने सहकार विभागातील विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व प्रादेशीक सहसंचालक, सहकारी संस्था यांची अ वर्ग संस्थांच्या निवडणूकीकरीता आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची ब वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, दुरध्वनी क्रमांक व ईमेलची माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
5. **तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी :-** प्राधिकरणाने सहकार विभागातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व उपनिबंधक, सहकारी संस्था यांची क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, दुरध्वनी क्रमांक व ईमेलची माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
6. **ई-2 नमुन्यातील माहिती :-** निवडणूकीस पात्र सहकारी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/सचिव यांनी ई 2 नमुन्यातील माहिती संचालक मंडळाची मुदत संपण्यापुर्वी सहा महिने अगोदर संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. ई 2 नमुना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
7. **ई -3 नमुन्यातील मतदार यादी :-** निवडणूकीस पात्र सहकारी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/सचिव यांनी ई 3 नमुन्यातील मतदार यादी संचालक मंडळाची मुदत संपण्यापुर्वी 120/150 दिवस अगोदर संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. ई 3 नमुना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

8. **प्रारूप मतदार यादीवर दावे/आक्षेप/हरकती नोंदवणे** :- प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करुन मतदारयादीवर दावे/हरकती/आक्षेप दाखल करणे बाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सुचवले असता संस्थेच्या बाबतीत सभासदाने व संघीय संस्थेच्या बाबतीत मतदानाकरीता प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने मतदार यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती (omission)किंवा चुक (error) विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. अ व ब वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता सदरची मुदत प्रारूप मतदारयादी प्रसिध्दी पासून 10 दिवसांची असणार असून क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता सदरची मुदत प्रारुप मतदारयादी प्रसिध्दीपासून 7 दिवसांची असणार आहे.

9. **निवडणुक निधी :-** निवडणूकीस पात्र संस्थेने निवडणुकीकरीता प्राधिकरणाने विहीत व आवश्यक केलेला निवडणूक निधी आगाऊ स्वरुपात जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्यास्तरावर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या नावाने राष्ट्रीयकृत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडण्यात आलेले आहे.

10. **नागरीकांची सनद प्रसिध्द करणे** :- मान्यता प्राप्त नागरीकांची सनद प्राधिकरणातील दर्शनी जागेवर व प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

11. **नागरीकांची सनद अदयावत करणे :-** मान्यता प्राप्त नागरीकांची सनद प्रत्येक वर्षाच्या 2 मे रोजी आवश्यकतेनुसार अदयावत करावी.